महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन आदेश क्रमांकः प्रतिनि २०१८/(प्र.क्र. १०३ /२०१८)/का.१४

मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: २५ मे, २०१८

आदेश

श्री.समीर सावंत, अवर सचिव, कृषी व पदुम विभाग यांची सिडको-नैना प्रकल्पां अंतर्गत भूमी व भूमापन अधिकारी या पदावर प्रथमत: एक वर्षाच्या कालावधीसाठी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

अ) श्री.समीर सावंत, अवर सचिव ज्या तारखेला प्रतिनियुक्तीच्या पदावर रूजू होतील त्या तारखेपासून प्रतिनियुक्तीच्या सेवेचा प्रारंभ होईल आणि ती सेवा ज्या तारखेला तो आपल्या शासकीय पदाचा कार्यभार पुन्हा स्विकारील त्या तारखेला समाप्त होईल.

ब) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन/सक्षम प्राधिकाऱ्यास राहील.

क) जर त्यांची सेवा स्वीयेतर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही तर त्यांना मूळ विभागाकडे परत पाठविण्याची मुभा स्वीयेतर नियोक्त्याला राहील. मात्र याप्रमाणे परत पाठविण्यापूर्वी स्वीयेतर नियोक्त्याने शासनाला/सक्षम प्राधिकाऱ्याला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे; आणि

ड) त्यांनी मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे अशी कमीत कमी तीन महिन्यांची लेखी नोटीस शासनाला / सक्षम प्राधिकाऱ्याला दिल्यानंतर त्यांना मूळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहील.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा... इ.) नियम १९८१ मधील नियम ४० (परिशिष्ट दोन) मधील तरतुदी विचारात घेऊन कृषी व पदुम विभाग व नगर विकास विभाग यांनी प्रतिनियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती आपआपसात ठरवाव्यात.

३. श्री.समीर सावंत, अवर सचिव यांच्या इतर सर्व प्रशासकीय बाबी कृषी व पदुम विभागामार्फत हाताळण्यात येतील.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२५१६५८३१७६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2018.05.25 16:56:32 +05'30'

(ग.भि.गुरव)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री.समीर सावंत, अवर सचिव, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई (विभागामार्फत)

प्रत,

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,

३. अ.मु.स.(सेवा),सा.प्र.वि., मंत्रालय, मुंबई,
४. अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, कृषी व पदुम विभाग / नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. सह सचिव/उप सचिव (आस्थापना), कृषी व पदुम विभाग / नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
७. निवडनस्ती कार्यासन-१४